# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २२९-२२** **दिनांक २९/०७/२०२२**

## घरफोडी करणा-या दोन आरोपींना अटक करुन घरफोडीचे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणण्यात नालासोपारा पोलीसांना यश.

दिनांक ०७/०७/२०२२ रोजी फिर्यादी विजय हरी नाईक वय-४४ वर्षे यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, फिर्यादी हे दिनांक ०७/०७/२०२२ रोजी बोरीवली येथे कामानिमीत्त गेले होते. राहते घरातुन जातांना त्यांनी घराचे कुलूप बंद करुन गेले होते. त्यानंतर फिर्यादी हे सायंकाळी उशीराने घरी परत आले असता त्यांना त्यांचे घराचा दरवाजाची कडी व कुलूप तुटलेले दिसले. फिर्यादी यांनी त्यांच्या घराची पाहणी केली असता त्यांना त्यांच्या घरातील कपाटात ठेवलेले रोख रक्कम ३५,०००/- रु. चोरी झालेले दिसुन आले. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २८७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये गेल्या काही दिवसांपासुन घरफोडी चो-यांचे प्रमाण वाढल्याने व त्याबाबत वेगवेगळे स्वंतत्र गुन्हे दाखल झाल्याने परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता गुन्हयातील आरोपी हा नालासोपारा पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहण्यास असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. संशयीताबाबत अधिक माहिती प्राप्त करुन आरोपी नामे १) खैरुल सिमुल शेख वय-२० वर्षे रा. अमननगर, सोपारागाव, नालासोपारा पश्चिम २) रोहित ऊर्फ बारक्या दिलीप गुट्टे वय- २१ वर्षे रा. भुईगाव डोंगरी, नालासोपारा पश्चिम ता.वसई यांना दिनांक १९/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये मागील काही दिवसामध्ये केलेल्या खालीलप्रमाणे ०५ गुन्हयांची कबुली दिली असून त्यांचेकडून गुन्हयात चोरीस मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | गुन्हा रजि. नं. I २८७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८०, ३४ अन्वये |
| ०२ | गुन्हा रजि. नं. I २८५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८०, ३४ अन्वये |
| ०३ | गुन्हा रजि. नं. I २९०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ अन्वये |
| ०४ | गुन्हा रजि. नं. I २९६/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८०, ३४ अन्वये |
| ०५ | गुन्हा रजि. नं. I ३०८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८०, ३४ अन्वये |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, श्री चंद्रकांत जाधव, सहा. पोलीस आयुक्त नालासोपारा यांचे मार्गदर्शनाखाली श्री विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, श्री राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गुन्हे प्रकटिकरण पथकाचे सपोनि/पंडीत मस्के, सपोनि/अमोल तळेकर, पोहवा/किशोर धनु, पोना/सचिन कांबळे, पोना/अमोल तटकरे, पोशि/कल्याण बाचकर, पोशि/राजेश नाटुलकर, पोना/ढोणे ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे.

-----------ooooooo---------------